निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २०१ वा.
बुधवार - २४ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


## मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ जाणार शेतकऱ्याच्या बांधावर

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** मराठवाड्यात आलेल्या महापुराच्या परिस्थितीमुळे (चरीरींहुरवर त्रश्रेव) जनजीवन विस्कळीत झालं असून अनेकांना स्थलांतर करावं लागलं आहे. या महापुरात शेती पिकं जमीनदोस्त झाली असून अनेक जनावरंही दगावली आहेत. यामध्ये आतापर्यंत ८ जणांचा जीव गेला असून अनेक ठिकाणी बचाव पथकाचं कार्य अद्याप सुरू आहे. मराठवाड्यात अतिवृष्टी झालेल्या ठिकाणांची पाहणी आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह सर्वच मंत्री करणार आहेत. तसेच त्या त्या जिल्ह्यांचे पालकमंत्रीही दौऱ्यावर असणार आहेत.

**उच् ऊर्शींशपवीर त्रश्रवपर्रींळी चरीरींहुरवर तळीळीं : कुणाचा दौरा कुठे?**

मुख्यमंत्री फडणवीस बुधवारी सोलापूर आणि लातूर जिल्ह्याचा दौरा करणार आहेत. उपमुख्यमंत्री



अजित पवारही सोलापूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे धाराशिव जिल्ह्यातील पूरस्थितीचा आढावा घेणार आहेत. पालकमंत्री त्या त्या जिल्ह्यांच्या दौऱ्यावर जाणार असून पूरस्थितीची पाहणी करणार आहेत.

मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत आतापर्यंत जवळजवळ २३ टक्के शेतीचं नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. विशेषतः मराठवाड्यात अतिवृष्टी, ढगफुटी, पूराने थैमान घातलंय. या आठवड्यात पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. अशा स्थितीत बळीराजा आणि सर्वसामान्यांना तातडीने दिलासा देण्याची गरज असल्याचं विरोधी पक्षांचे नेते सांगत आहेत.

शेतकऱ्यांना मदत करा, विरोधकांची मागणी

आपत्तीग्रस्तांना तातडीची मदत द्यावी, तसंच ओला दुष्काळ जाहीर करावा अशीही मागणी होत आहे. शेतकऱ्यांना तातडीनं हेक्टरी ५० हजारांची मदत द्यावी, अशी मागणी शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे खासदार रोहित पवार यांनी केली. तर त्याच पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शक्तिपीठ महामार्ग रद्द करून तो पैसा शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी वापरावा, अशी मागणी पुढे केली.

विरोधकांच्या या मागण्यांवर मुख्यमंत्र्यांनी मदतीची आकडेवारी दिली. मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर पूरग्रस्तांना तातडीनं मदतीसाठी जीआर काढण्यात आल्याचं ते म्हणाले. पुढल्या आठ दिवसांत २ हजार २१५ कोटी रुपये शतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. तसंच सर्व मंत्र्यांना शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याचे आदेश दिल्याचं मुख्यमंत्र्यानी सांगितलं.

आमदार-खासदार फिल्डवर उतरले

सोमवारी रात्री धाराशीवरचे खासदार ओमराजे निंबाळकर हे परांडा तालुक्यात वडनेर इथे अतिवृष्टीची पाहणी करण्यासाठी गेले होते. तेव्हा एक आजी आणि दोन वर्षांचा मुलगा पाण्यात अडकल्याचं त्यांना दिसलं. तेव्हा ओमराजे स्वतः पाण्यात उतरले आणि त्यांनी या आजी-नातवाला सुखरूप बाहेर काढण्यास मदत केली.

२०१६ साली जिथं रेल्वेनं पाणी पुरवावं लागलं होतं, तो लातूर जिल्हा आज पूरस्थितीशी दोन हात करत आहे.

काँग्रेस आमदार अमित देशमुख यांनीही शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी केली. तातडीनं पंचनामे करून नुकसान भरपाईची मागणी देशमुख यांनी केली आहे.सिल्लोडचे शिवसेना आमदार अब्दुल सत्तार यांनीही आपल्या मतदारसंघात पूरग्रस्तांच्या व्यथा जाणून घेत त्यांना उपयोगी साहित्याचं वाटप केलं.

उत्तर महाराष्ट्राच्या काही भागात पुरानं मोठं नुकसान केलं आहे. त्यामुळे शिवसेनेचे मंत्री गुलाबराव पाटीलही मैदानात उरलेले दिसले. त्यांनी जळगावच्या पाचोऱ्या तालुक्यात अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली.

बीडमधल्या आष्टीचे भाजप आमदार सुरेश धस यांनीही पाटोदा, भाकरेवस्ती, पारगाव आणि मांजरा नदीकाठच्या अन्य पूरग्रस्त गावांना भेटी दिल्या. तसेच त्यांनी प्रशासनाची बैठक घेऊन मदतकार्याचा आढावाही घेतला.

## नारंगी धरणातून पाण्याचा विसर्ग नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर/ प्रतिनिधी /** वैजापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या तसेच जवळपास पंधरा गावांना सिंचनासाठी अतिशय उपयुक्त असलेल्या नारंगी मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मागील २४ ते ४८ तासात झालेल्या अतिवृष्टीमुळे या परिसरातील नांदगाव, चांडगाव तसेच पालखेड, डोंगरगाव (तालुका येवला) येथील पाण्याची आवक वाढल्याने प्रकल्पात मंगळवारी दुपारपर्यंत जवळपास ८५ टक्के पाणीसाठा झाला होता. नांदूर मधमेश्वर विभागाचे सहाय्यक अभियंता पवन चव्हाण व त्यांच्या सहकाऱ्यांनी पाणी पातळीत होत असलेल्या वाढीवर लक्ष ठेवून सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास धरणाचे पाच पैकी दोन दरवाजे उघडून नदी पात्रात पाणी सोडले. या धरणाची एकूण क्षमता १३.२९ दलघमी असून त्यातील जिवंत पाणी साठा ११. ४९ दलघमी आहे. उच्चतम पाणी पातळी ५३३.४० मी असून मंगळवारी पाणी पातळी ५२३.९५ मीटर पर्यंत पोहचली होती. साधारणपणे पाच टक्क्यांचे मार्जिन राखून धरणातील पाणीसाठा दरवाजे उघडून नियंत्रित केला जातो. त्यामुळे ९५ टक्के पाणी साठा झाल्यानंतर पाणी



सोडण्याची कार्यवाही करण्यात येते अशी माहिती जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिली. नदीपात्रात ७० ते १०० क्यूसेक या वेगाने विसर्ग करण्यात येत असून पाऊस थांबला तर प्रकल्पातील पाणीसाठा बघून विसर्ग थाबवण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती नगर परिषदेचे मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी दिली. नदी पात्रात विसर्ग करण्यात आल्याने दत्तनगर, दत्तवाडी, कावेरी, डवाळा, खंबाळा, भऊर, गोयगाव, हिंगोणी, कांगोणी, पुरणगाव आदी गोदावरी पट्ट्यातील गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. तालुक्याचे आमदार रमेश बोरनारे व माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनीही नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

## पुलांची उंची वाढविण्या साठी दरवर्षी मागणी नागरिक करीत असताना थकून गेले अखेर पुलाने जीव घेतल्याचा

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड /प्रतिनिधी/**कन्नड तालुक्यातील टाकळी शाहु सतत सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गावोगावी दुर्दैवी घटना घडत आहेत. अशाच घटनेत साहेबराव नथ्थू दहीहंडे (वय ४८, रा.टाकळी शाहु.) यांचा पाण्याच्या प्रवाहात वाहून मृत्यू झाल्याची घटना घडली.मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी साधारण ८ वाजता साहेबराव दहीहंडे हे त्यांच्या गट नं. १४१ मधील शेतघरातून गायीचे दूध घेऊन टाकळी बु. गावाकडे निघाले होते. दरम्यान, गावाच्या दक्षिणेकडील मोहरा रस्ता येथील पुलावरून वाहणारे पाणी पार करण्याचा प्रयत्न करताना त्यांचा तोल जाऊन ते वाहून गेले.अतिवृष्टीमुळे पाण्याचा प्रवाह जोराचा असल्याने त्यांचे नियंत्रण सुटले व ते पाण्याबरोबर खेचले गेले. याबाबतच्या घटनेनंतर ग्रामस्थांनी शोध घेतल्यावर त्यांचे प्रेत सुमारे २ किलोमीटर अंतरावर केटी बांधावर सापडले. नवयुवकांनी मोठ्या श्रमाने दोर बांधून मृतदेह बाहेर काढला उत्तरीय तपासणी साठी नाचनवेल प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले . डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केल्यानंतर शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला . यावेळी पिशोर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक शिवाजीराव नागवेसह पोलिसांनी पंचनामा केला . महसूल विभागाने घटणास्थळी पंचनामा करून वरिष्ठांना अहवाल सादर केला . मयत साहेबराव दहीहंडे यांच्यावर शोकाकुल वातावरणात दुपारनंतर अंत्यसंस्कार करण्यात आले .त्यांच्या पश्चात पत्नी अविवाहीत



मुलगा व विवाहीत मुलगी जावई असा परिवार आहे . पुलांची उंची वाढविण्या साठी दरवर्षी मागणी नागरिक करीत असताना थकून गेले अखेर पुलाने जीव घेतल्याचा संताप नागरिक व नातेवाईकांनी केला.याकामी पोलिस प्रशासनाने घटणेची नोंद करून पुढील तपास करीत आहे . घटणास्थळाची दुरावस्था व जीव मुठीत घेऊन ये जा करणारे शेतकरी सदर ठिकाणी यापूर्वीच पूल वाहून गेला असल्याने त्या मार्गावर मोठे खडे व खोल पाण्याचा प्रवाह असल्याचे पंचांनी नमूद केले.मयत साहेबराव दहीहंडे यांचा मुख्य व्यवसाय शेती असून ते टाकळी खुर्द येथील रहिवासी होते.या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## वेरूळची पिके धोक्यात शेतकरी चिंतेत शासनाने तातडीने भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी** /खुलताबाद तालुक्यातील यंदा वेरूळसह खुलताबाद तालुक्याला पावसाने झोडपले असून यावर्षी अनेक वर्षांचा विक्रम पावसाने मोडीत काढला आहे. सतत सुरू असलेल्या संततधारेमुळे वेरूळसह परिसरातील कसाबखेडा, मंबापुर, पळसवाडी, तलाववाडी, शादुलवाडी, शेकापुरी, तिसगाव, निरगुडी, पिंपरी, पळसगाव, आखातवाडा येथील पिके धोक्यात आले आहेत. मक्का, सोयाबीन, कापूस, आदी पिकांनी माना टाकल्या आहेत.

तसेच सूर्यदर्शन न झाल्याने पाने पिवळी पडत असून करपा, अळी रोगांचा प्रादुर्भाव पिकांवर वाढला आहे. यामुळे शेतकरी चिंतेत आला आहे.

शासनाने तातडीने सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी वर्गातून करण्यात येत आहे.

यंदा सुरुवातीपासूनच राज्यभरामध्ये पावसाने तुफान वर्षाव केला आहे. त्यात खुलताबाद तालुका ही मागे राहिलेला नाही. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांची मका आडवी झाली आहे. पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे, शिवाय जंगली जनावरांचा प्रादुर्भाव ही मोठा वाढला आहे.

यामुळे तालुक्यातील शेतकरी वर्गाचे मोठे नुकसान होत असून शासनाने तातडीने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी.

**-सामाजिक कार्यकर्ते सतीश देवेंद्र लोखंडे वेरूळकर**

(मी आधीच कर्जबाजारी झालो आहे. शेतात सोयाबीन आणि मक्का पेरली आहे. या पिकाच्या भरोशावर मी कर्ज काढले होते. आता मक्का व सोयाबीन पिकाचे मोठे नुकसान झाले असून त्यात रानडुकरांचा देखील त्रास वाढला आहे. अनेक ठिकाणी मका रानडुकराने तुडवली आहे. नुकसान भरपाई सरकारने द्यावी.

**शेतकरी कारभारी औटे, पळसवाडी)**

(अतिवृष्टीमुळे येणाऱ्या उत्पन्नापेक्षा खर्च जास्त झाला आहे. कांदा चाळीमध्ये सडत आहे. मक्का-सोयाबीन पीकही हातचे गेले आहे. त्यात अद्रकीला



भाव नाही.

यामुळे माझे आर्थिक गणित कोलमडले असून शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी. **शेतकरी आप्पासाहेब विष्णू वेताळ, वेरूळ)**

## संक्षिप्त

### घरगुती ग्यासचा परळीत अनागोंधी कारभार

**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी / प्रतिनिधि /** शहरात घरगुती ग्यास हा घर कामास कमी पण हॉटेल वाल्याना सरास विक्री केले जात आहे त्यातच सध्या गेल्या ५ दिवसपासून ग्यास गळती लागली आहे गाड़ी आली नाही माल शिल्लक नाही असे शब्द वैध्यनाथ ग्यास डिस्टब्यूटर यांच्या कडून संघण्यात येत असून गेल्या ५ दिवस पासून बुकिंग केलेल्या ग्राहकाना ग्यास मिळत नसून प्रचंड रोष नागरिकांतुन व्यक्त केला जात आहे.दरम्यान अधिक माहिती अशी की परळी शहरात ग्यास चा काळा बाजार मांडला जात असून घरगुती ग्यास ग्राहकांना मिळत नसून माल शिल्लक नसल्याचे फलक ही इज्जसी बूथ येथे लावण्यात येत असून आलेली एखाण्दि गाड़ी त्यातून अर्धा माल तर हॉटेल ला विक्री केला जात असल्याचे चर्चा सत्र परळी शहरातील नागरिकांतुन मोठी चर्चा समोर येत आहे येन सना सुदिच्या काळात असा ग्यास चा तुटवडा पड़ल्याने परळी शहरातील नागरिकांतुन संतप्त प्रतिक्रिया केली जात आहे.सरकारने दुकान किंव्हा हॉटेल साठी वेगळे ग्यास टाकी चे वाटप करण्यास संगितले असूनही घरगुती ग्यास चढ़या भावाने विक्री करुंन काळा बाजार केला जात असून यावर लगाम लागेल का असा संतप्त सवाल परळी शहरातील नागरिकांतुन केला जात आहे.



### ग्रामीण डाक जीवन विमा प्रतिनिधी नियुक्तीसाठी अर्ज मागविले

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर डाक विभागात कन्नड, गंगापूर, खुलताबाद, वैजापूर, पैठण, फुलंब्री, सिल्लोड, अंबड, बदनापूर, भोकरदन, घनसावंगी, जाफराबाद आणि सोयगाव या तालुक्यांमध्ये ग्रामीण डाक जीवन विमा प्रतिनिधी एकूण ५० जागांवर नेमणे आहेत. आवश्यक पात्रताः- वयोमर्यादा-१८ ते ६० वर्षे शैक्षणिक पात्रता - पाच हजार पेक्षा कमी लोकसंख्येच्या गावातील रहिवासी असल्यास -किमान १०वी पास, पाच हजार पेक्षा जास्त लोकसंख्येच्या गावातील रहिवासी असल्यास - किमान १२ वी पास ,सुशिक्षित बेरोजगार, निवृत्त कर्मचारी, माजी सैनिक, अंगणवाडी सेविका, महिला बचत गट यांना विशेष प्राधान्य देण्यात येईल.इच्छुकांनी प्रवर अधीक्षक, डाकघर छत्रपती संभाजीनगर विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर -४३१००१ यांचे कार्यालयात जन्म तारीख व शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्यासाठी लागणारे मूळ कागदपत्रे, त्या कागदपत्राची एक साक्षांकीत पत्र व दोन पासपोर्ट आकाराच्या छायाचित्रांसह दि.३० सप्टेंबर २०२५ पर्यंत आवेदन पत्र सादर करावी. तसेच या नियुक्ती तात्पुरत्या आणि कमिशन तत्वावर आहे,याची नोंद घ्यावी,असे प्रवर अधीक्षक, डाकघर छत्रपती संभाजीनगर विभाग यांनी कळविले आहे.

### अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचतगटांना मिनी ट्रॅक्टर; लाभार्थी निवड शुक्रवारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या बचत गटांना ९०% अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने कल्टीव्हेटर किंवा रोटाव्हेटर व ट्रेलर यांचा पुरवठा करणे ही योजना राबविण्यात येते. या योजनेसाठी सन २०२३- २४ मधील पात्र ६५ लाभार्थ्यांपैकी सोडत पद्धतीने ४५ लाभार्थ्यांची निवड शुक्रवार दि.२६ रोजी दुपारी साडेबारा वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा छत्रपती संभाजीनगर येथील सभागृहात होणार आहे. त्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन सहायक आयुक्त रविंद्र शिंदे यांनी केले आहे.

### नवरात्रीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात महिला सक्षमीकरण उत्सव

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** नवरात्रोत्सवानिमित्त जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून महिला सक्षमीकरण अभियान 'उत्सव नवरात्रीचा, उत्सव स्त्री शक्तीचा' राबविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात हा कार्यक्रम आज सुरु झाला. या अंतर्गत महिला सुरक्षितता,आरोग्य महिलांचे, प्रशासन, आर्थिक सक्षमीकरण, वक्तृत्व स्पर्धा, महिला बालविकास विभागाच्या योजना, महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना आणि सांस्कृतिक पर्व असे विविध कार्यक्रमआगामी आठ दिवसात आयोजीत करण्यात आले आहेत. आज या कार्यक्रमाचा प्रारंभ जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. पोलीस आयुक्तालयातील सायबर सेलचे सहायक पोलीस निरीक्षक कदीर देशमुख, जिल्हा शिक्षणाधिकारी माध्यमिक आश्विनी लाटकर, उपजिल्हाधिकारी डॉ. सुचिता शिंदे, संगिता राठोड, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी दराडे आदी उपस्थित होते.

जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने आपल्या भाषणात, स्त्री राज्याचा इतिहास सांगत, घटस्थापना व नवरात्रोत्सवामागील परंपरेचा इतिहास सांगितला. कदीर देशमुख यांनी सायबर सुरक्षा याविषयी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी महिलांनी या उत्सव काळात आयोजीत या कार्यक्रमांचा लाभ घेऊन विविध विषयांवरील माहिती प्राप्त करुन घ्यावी,असे आवाहन केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. मीरा ढास यांनी केले.

## लेखनातील स्पष्टता आणि अचूकतेची ओळख

लेखन हे मानवाच्या संवादाचे सर्वात मौलिक माध्यम आहे. शब्दांच्या योग्य निवडीसह वाक्यांचे संरचनात्मक संगठन केवळ विचार मांडण्यासाठीच नाही तर वाचकाला स्पष्ट संदेश पोहचवण्यासाठीही अत्यावश्यक ठरते. या संदर्भात विरामचिन्हांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. विरामचिन्हे, जसे की पूर्णविराम, अल्पविराम, प्रश्नचिन्ह, उद्गारवाचकचिन्ह, कोष्टक, उधृतचिन्ह इत्यादी, ही शब्दांच्या समूहाला अर्थपूर्ण करतात. या चिन्हांचा अचूक आणि योग्य वापर केल्यास वाक्याचा अर्थ स्पष्ट होतो, विचार अधिक प्रभावी पद्धतीने मांडता येतो, आणि लेखन वाचकास समजण्यास अधिक सुलभ होते. विरामचिन्हांच्या योग्य वापराविना लेखन अधुरे, असंबद्ध किंवा गोंधळात टाकणारे ठरते. उदा. "Let's eat, Grandma!' आणि "Let's eat Grandma!' या दोन वाक्यांमध्ये फक्त एका अल्पविरामाच्या बदलामुळे अर्थ पूर्णपणे बदलतो. पहिल्या वाक्यात आपण आजीला खाऊ घालूया असा अर्थ व्यक्त करतो, तर दुसऱ्या वाक्यात आजीला खाऊन टाकूया असा गंभीर अर्थ बनतो. या उदाहरणातून स्पष्ट होते की विरामचिन्हे केवळ शब्दांच्या अलंकारासाठी नाही, तर वाचनाच्या अर्थपूर्णतेसाठीही अत्यंत गरजेची आहेत.

राष्ट्रीय विरामचिन्ह दिनाची संकल्पना २००४ साली अमेरिकेतील लेखक आणि अर्थतज्ज्ञ जेफ रुबिन यांनी मांडली. त्यांनी लक्षात आणून दिले की, लेखनाच्या गुणवत्तेत सुधारणा आणण्यासाठी आणि वाचकांना विचारांची स्पष्टता प्रदान करण्यासाठी विरामचिन्हांचे महत्त्व पटवणे गरजेचे आहे. या दिवसाचे उद्दिष्ट फक्त लेखनातील चुका कमी करणे नाही, तर समाजातील सर्व वयोगटातील लोकांना विरामचिन्हांचा योग्य वापर शिकवणे, लेखन कौशल्य सुधारणा करणे, आणि संवाद अधिक प्रभावी बनवणे आहे. हा दिवस औपचारिकरित्या दरवर्षी २४ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. शाळांमध्ये आणि विद्यापीठांमध्ये विविध स्पर्धा, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित केले जातात, ज्यामध्ये विद्यार्थी, शिक्षक, लेखक आणि भाषाप्रेमी सहभागी होतात. यामुळे विद्यार्थ्यांना विरामचिन्हांच्या योग्य वापराची सवय लागते आणि त्यांच्या लेखनात सुधारणा होते.

विरामचिन्हांचा अभ्यास करताना त्यांच्या प्रकार आणि उपयोग समजणे महत्त्वाचे ठरते. पूर्णविराम वाक्याच्या समाप्तीसाठी वापरला जातो आणि वाक्याला संपूर्णता प्रदान करतो. अल्पविराम शब्दांच्या यादीतील विभागणीसाठी, वाक्यातील विचार वेगळे करण्यासाठी किंवा वाक्याचे प्रवाह सुलभ करण्यासाठी वापरला जातो. प्रश्नचिन्ह प्रश्न विचारताना वापरले जाते, जे वाचकाला थेट संवादात सहभागी होण्याची संधी देते. उद्गारवाचकचिन्ह भावनिक अभिव्यक्तीसाठी उपयुक्त असते, जसे की आश्चर्य, आनंद, राग किंवा उत्साह व्यक्त करताना ते वाफारले जाते. कोष्टक अतिरिक्त माहिती देण्यासाठी, स्पष्टीकरण किंवा उदाहरण मांडण्यासाठी वापरले जाते. उधृतचिन्ह मुख्यत्वे इतरांचे विचार, भाषण किंवा लेखन उद्धृत करताना वापरले जाते, तर कोलन व सेमीकोलन सूचीत केलेल्या सूची किंवा संबंधित विचार जोडण्यासाठी उपयुक्त ठरतात. या विविध चिन्हांचा योग्य उपयोग लेखनाच्या स्पष्टतेसाठी अत्यावश्यक आहे.

## पीएम-सूर्यघर मोफत वीज योजनेबाबत ग्राहकांसाठी २६ सप्टेंबर रोजी मेळावा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी/** प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत अर्ज केलेल्या व नव्याने अर्ज करू इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी महावितरण व ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २६ सप्टेंबर रोजी सुसंवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस १७ सप्टेंबर ते महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर या कालावधीतील सेवा पर्वात महिना तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळवून देणाऱ्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणतर्फे विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आयोजित या मेळाव्यात शुक्रवारी तापडिया नाट्यमंदिरात दुपारी २ ते ५ या वेळेत छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील ज्या ग्राहकांनी पीएम-सूर्यघर योजनेत अर्ज केला आहे, त्यांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात येणार आहे. त्यानंतर दुपारी ५ वाजता योजनेच्या नवीन अर्जाबाबत महावितरणचे अधिकारी व कंत्राटदारांचे प्रतिनिधी मार्गदर्शन करणार आहेत. योजनेसाठी सवलतीच्या दराने कर्ज देण्यात येते, याबाबत विविध बँकांचे प्रतिनिधी माहिती देणार आहेत.

**सेवा पर्वात महावितरणचे विशेष अभियान**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सुरू केली आहे. सर्वसामान्य घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ही योजना आहे. या योजनेमध्ये छतावर सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी वीज ग्राहकांना केंद्र सरकारकडून थेट अनुदान मिळते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ३० हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ६० हजार रुपये आणि तीन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. हाउसिंग सोसायट्यांनाही ५०० किलोवॅटपर्यंत प्रती किलोवॅट १८ हजार रुपये अनुदान मिळते.एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पातून सूर्यप्रकाशाच्या उपलब्धतेनुसार महिना अंदाजे १२० युनिट, दोन किलोवॅट प्रकल्पातून अंदाजे २४० युनिट तर तीन किलोवॅट प्रकल्पातून अंदाजे ३६० युनिट वीजनिर्मिती होते. वीज ग्राहकांच्या गरजेपेक्षा अधिक वीज सौर ऊर्जा प्रकल्पातून तयार झाल्यामुळे वीजबिल शून्य होते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला विकून उत्पन्नही मिळविता येते.

छत्रपती संभाजीनगर परिमंडलात आतापर्यंत २३ हजार १८४ वीजग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला आहे. त्यांनी बसविलेल्या सौर वीजनिर्मिती प्रकल्पांची एकूण क्षमता ८१.८४ मेगावॅट झाली आहे. तर जवळपास ९५०० ग्राहकांच्या छतावर सौर ऊर्जा संच बसवण्याचे काम प्रगतिपथावर आहे.

योजनेचा लाभ घेण्यासाठी वीज ग्राहकांनी https://pmsuryaghar.gov.in या वेबसाईटवर घरबसल्या ऑनलाईन नोंदणी करावी. वीज ग्राहकांना आपल्या पसंतीचा पुरवठादार निवडता येतो. महावितरणने योजनेचा लाभ घेण्याची संपूर्ण प्रक्रिया ऑनलाईन केली आहे. सेवा पर्वात योजनेची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महावितरणच्या सर्व कार्यालयांना सूचना देण्यात आल्या असून या योजनेसाठीच्या अर्जांना प्राधान्य देण्यास सांगण्यात आले आहे. महावितरणच्या जवळच्या कार्यालयातही या योजनेबद्दल चौकशी करता येईल. दरम्यान, तापडिया नाट्यमंदिरात २६ सप्टेंबर (शुक्रवारी) दुपारी २ वाजेपासून सुरू होणाऱ्या या मेळाव्याचा छत्रपती संभाजीनगर व जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण व ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनने केले आहे.

## केजच्या गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकरला तात्काळ अटक करा-केविसंस




**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनिधी/** केजच्या प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झालेला असून आरोपी लक्ष्मण बेडसकरला तत्काळ अटक करा तसेच या घटनेत लोक घटनास्थळी कांहीं मिनिटात पोहोंचले तसेच त्यांनी घटनास्थळाचे व्हिडिओ काढलेले आहेत आणि आरोपी बेडसकरच्या गाडीतील मोबाईल काढून घेतला आहे. यामुळे या प्रकरणात लक्ष्मण बेडसकर तर दोषी आहेच परंतु निर्जन ठिकाणी पोहोंचेपर्यंत सोबतच्या लोकांनी आरडाओरड का केली नाही अशा शंका उत्पन्न होत असल्याने सोबत असणाऱ्या व पाठलाग करत लगेच मागे पोहोंचलेल्या लोकांचीही सखोल चौकशी करावी अशी मागणी केज विकास संघर्ष समितीने केली असून आरोपीला तात्काळ अटक करून पीडितेला न्याय न मिळाल्यास जनतेच्या सहभागाने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

केज येथे इयत्ता नववीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीचा येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांनी विनयभंग केल्याची तक्रार पीडितेने केज पोलिसांकडे केली आहे. मात्र आज तिसऱ्या दिवशीही आरोपी लक्ष्मण बेडसकर फरार आहे. बेडसकर यांच्या व्हायरल कॉल रेकॉर्डिंग पाहता हा व्यक्ती महिला व मुलींच्या सतत संपर्कात असल्याचे जाणवते. याच त्याच्या वृत्तीचा अंदाज घेऊन कांही लोकांनी नियोजनबद्ध पद्धतीने त्याला जाळ्यात ओढले आहे. मात्र याच वेळी अशा जाळ्यात अडकण्यासाठी बेडसकर कांहीं लहान बालक नाही. त्यामुळे प्राप्त माहितीवरून या प्रकरणात समाज व कायद्याच्या नजरेत निर्दोष दिसत नाही. तर दुसऱ्या बाजूला या प्रकरणाचा फायदा घेऊन या घटनेला घडवण्यासाठी कांहीं लोकांची टोळी मदत व काम करत असण्याची शक्यताही बोलली जाते.

त्यामुळे केज पोलिसांनी या प्रकरणात आरोपीला व या घटनेत प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष सहभागी लोकांना ताब्यात घेऊन सखोल चौकशी करावी आणि या घटनेतील पूर्ण सत्य बाहेर आणावे अशी मागणीही समितीने केज पोलिसांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. कांहीं लोक आपल्या फायद्यासाठी अशा घटना पूर्वनियोजित पद्धतीने घडवून केज व परिसरात भीतीचे व चिंतेचे वातावरण बनवत असतील तर त्यांचा बंदोबस्त होणेही गरजेची आहे असेही निवेदनात म्हटले आहे.

आरोपीला व प्रकरणात सहभागी लोकांना तात्काळ अटक न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.

## शेतकऱ्यांना सरसगट तात्काळ नुकसान भरपाई द्या - खा. रजनीताई पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज /रमेश इतापे /** मागील पंधरा दिवसापासून बीड जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे. शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या शेती मातीसगट वाहून गेली आहे. जनावरे गुरे वाहून गेली आहेत. काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या खा.रजनीताई अशोकराव पाटील यांनी प्रशासनाने सरसकट शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी केली आहे.शेती हा शेतकऱ्यांचा मुख्य आधार आहे. अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्तीमुळे उभ्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून त्याला तात्काळ मदतीची गरज आहे. करून शेतकऱ्यांना सरसगट मदत मिळाली पाहिजे थेट मुख्यमंत्र्यांकडे त्यांनी याबाबत मागणी करून संवाद साधला आहे.पुढे बोलताना खा. पाटील म्हणाल्या की, शासनाने तत्परतेने कार्यवाही केली नाही तर शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट होईल. त्यामुळे प्रशासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या विविध योजनांमधून तसेच आपत्ती व्यवस्थापन निधीतून तातडीने मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. शेतकऱ्यांच्या बाजूने उभे राहून सर्व स्तरांवर लढा देण्याचा निर्धार खा. रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मी सदैव बांधील असून, नुकसान भरपाई मिळेपर्यंत पाठपुरावा करत राहणार असल्याचे सांगितले.



## बेरोजगारीचे भीषण वास्तव

भारत हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. सध्या तर खाजगीकरणाचे पेव फुटले आहे त्यामुळे सरकारी नोकरी मिळवण्याचे तरुणांचे स्वप्न स्वप्नच राहणार आहे. वास्तविक गेल्या अनेक वर्षांपासून सरकारी नोकर भरती झालेली नाही. नोकर भरतीसाठी सरकार जाहिरात काढते. हजारो रुपये परीक्षा फी घेऊन तरुणांची परीक्षा घेते मात्र प्रत्यक्ष नोकरी काही देत नाही. कधी पेपर फुटीचे तर आणखी काही कारण देऊन भरती पुढे ढकलली जाते. शिक्षक भरती हे त्याचे उत्तम उदाहरण. आज सरकारच्या सर्वच खात्यात कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. एक लिपिक चार चार टेबल सांभाळीत आहे, एक शिक्षक चार चार वर्ग शिकवत आहे, गेली अनेक वर्षे पदोन्नती झालेली नाही जर सरकारने सरकारी नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याचा निर्णय रद्द करून भरती केली तर देशातील बेरोजगारी काही प्रमाणात का होईना कमी होईल मात्र सरकारला तरुणांच्या रोजगाराचे काहीही देणे घेणे नाही. नोकरी मागायला गेलेल्या तरुणांना राजकीय नेते पकोडे तळा म्हणत त्यांची कुचेष्टा करत आहेत. शिक्षण असून नोकरी नाही, शेती असून शेतात काही पिकत नाही. नोकरी नाही, शेतीही बेभरावशाची झाली आहे, स्वतःचा व्यवसाय करावा म्हटलं तर भांडवल नाही त्यामुळे आजचा तरुण प्रचंड अस्वस्थ आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

## स्वस्थ नारी म्हणजे सशक्त परिवाराची पायाभरणी !

समाजाच्या आरोग्याचा व देशाच्या विकासाचा पाया म्हणजे स्त्रीचे आरोग्य. कारण नारी हीच एका परिवाराची, समाजाची आणि अखेर राष्ट्राची मूळ शक्ती आहे. स्त्री निरोगी असेल तरच घर आनंदी असते आणि घर आनंदी असेल तरच समाज सक्षम होतो. हा विचार आपण मान्य केला, तर 'स्वस्थ नारी - सशक्त परिवार' हे फक्त घोषवाक्य न राहता भारताची दिशा दाखविणारा विचार आहे व हाच विचार भविष्यातील प्रत्यक्ष आयुष्याचा मंत्र ठरेल.

कारण स्त्री निरोगी असेल तर तिच्या मुलांचे आरोग्य चांगले राहते; घरातील इतर सदस्यांवरही तिचा सकारात्मक परिणाम होतो. परिवारातील प्रत्येक सदस्याचे आरोग्य हे आईच्या आरोग्यावर अवलंबून असते. जर आई निरोगी असेल तर तिचे मूलही निरोगी वाढते. स्त्रीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता तिला नियमित वैद्यकीय तपासणी, मानसिक शांती आणि कुटुंबाकडून आधार मिळाले तर संपूर्ण कुटुंब सक्षम, निरोगी आणि आनंदी राहते. म्हणूनच स्वस्थ नारी हीच सशक्त परिवाराची खरी गुरुकिल्ली आहे. सामाजिक पातळीवर मानसिकता बदलणे, महिलांच्या आरोग्याला प्राधान्य देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

आज स्त्रिया शिक्षण, उद्योग, नोकरी, राजकारण या क्षेत्रांत झेपावत असल्या तरी त्यांच्या आरोग्याकडे अजूनही दुर्लक्ष केले जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार भारतातील निम्म्याहून अधिक स्त्रिया रक्ताल्पतेने ग्रस्त आहेत. प्रसूतीदरम्यान योग्य वैद्यकीय सेवा न मिळाल्याने मातामृत्यू दरही चिंताजनक आहे.

ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये रक्ताल्पता, कुपोषण, प्रसूतीसंबंधी आजार अजूनही चिंतेचा विषय आहेत. शहरी भागात मात्र मधुमेह, स्थूलता, हृदयविकार यांसारखे जीवनशैलीशी निगडीत आजार वाढत आहेत. घरातील जबाबदाऱ्या, नोकरीतील ताण, समाजाच्या अपेक्षा या सगळ्यामुळे स्त्रीच्या आरोग्याकडे सर्वात शेवटी लक्ष दिले जाते. पण आकडेवारीच्या पलीकडे एक वेगळीच गोष्ट आहे. घरातील स्त्री जर आजारी पडली, तर घरातील वातावरणच बदलून जाते. मुलांच्या चेहऱ्यावरचे हसू हरवते, वृद्धांना आधार उरत नाही आणि पुरुष अस्वस्थ होतो. कारण नारी ही घराचे हृदय आहे. तिच्या हसण्यात कुटुंबाचे सौख्य दडलेले असते, तर तिच्या थकलेल्या नजरेत घराचे दुःख उमटते.

आज सरकार विविध आरोग्य योजना राबवत आहे, जसे प्रसूतीसाठी मोफत वैद्यकीय सेवा, पोषण आहार योजना, महिलांसाठी योग शिबिरे, स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छतागृह सुविधा पण केवळ सरकारी पातळीवर काम करून चालणार नाही. प्रत्येक परिवाराने, समाजाने, कुटुंबाने जागरूक होणे गरजेचे आहे. तसेच, आजच्या आधुनिक समाजात महिला शिक्षण, रोजगार, राजकारण, उद्योग या क्षेत्रात वेगाने प्रगती करत असल्या तरी आरोग्याच्या बाबतीत अजूनही मोठ्या अडचणी दिसून येतात. घरातील प्रत्येकाने हे लक्षात ठेवावे की, मुलींच्या आहाराची काळजी घेणे, किशोरवयीन मुलींना योग्य आरोग्य व स्वच्छतेचे शिक्षण देणे, स्त्रियांना नियमित आरोग्य तपासणीस प्रवृत्त करणे, घरकामात पुरुषांनी समतोल सहभाग वाढवणे आणि मानसिक आरोग्याबद्दल मोकळेपणाने संवाद साधने. या बाबी महिला आरोग्यासाठी महत्त्वाच्या ठरतात आणि या गोष्टींचा अवलंब झाला तरच 'स्वस्थ नारी-सशक्त परिवार' हा विचार प्रत्यक्षात उतरू शकेल. त्यासाठी कटिबध्द राहणे गरजेचे आहे, तेव्हाच हे शक्य होईल.

आज आपल्याला हे मान्य करावे लागेल की स्त्री ही फक्त घर चालवणारी नाही, तीच घर घडवणारी आहे. तिचे आरोग्य बळकट असेल तर कुटुंब आनंदी राहील आणि आनंदी कुटुंबातूनच सक्षम राष्ट्र उभे राहते.

स्त्री निरोगी असेल तरच कुटुंब सशक्त होईल आणि राष्ट्र अधिक प्रगत होईल. म्हणूनच, प्रत्येकाने आपल्यापासून सुरुवात करून स्त्रीच्या आरोग्याचे आणि सन्मानाचे रक्षण करणे हिच आजची खरी सामाजिक जबाबदारी आहे. शेवटी, निरोगी स्त्री, निरोगी पिढी, आनंदी घर म्हणजे सशक्त समाज आणि सशक्त समाज म्हणजे सक्षम राष्ट्र.

स्त्री पुरुष दोघंही समान आहेत आणि सुख मिळविण्यासाठी धडपडणं हा दोघांचाही अधिकार आहे.

फक्त पुरुषांना आयुष्यभर सुखात राहावं आणि दुःखाची विभागणी संपली पाहिजे. माणूस या नात्यानं पुरुषाला मिळतं ते जन्मसिध्द स्वातंत्र्य स्त्रीलाही मिळालं पाहिजे. ही स्त्री भूतकाळाशी जोडलेली असते, भावूक आणि हळवी असते. कुटुंबाचा सांभाळ करते, स्वत:ला निराधार वाटत असतांनाही कुटुंबाला आधार देते, पती, मुलगी, मुलगा यांच्यावर प्रेम करते. कधी त्यांचा दुरावा जाणवल्यावर येणारी विफलताही अनुभवते, ती व्यवसायात ही कर्तव्यदक्ष असते. एकंदरीत तिचा सहभाग महत्वाचा हे विसरुन चालणार नाही. चूल आणि मूल मध्ये गुरुफटलेल्या, चालीरितीच्या कुंपणात वावरणाऱ्या स्त्रीला समाजभय संकोच यामध्ये पार दडपून टाकलेलं, पण काळाच्या ओघात परिवर्तनाशिवाय पर्याय नाही.

या सबबीनंतर तिने टोकाचे पाऊल उचलून भरारी घेण्याचं ठरवलं. कुटुंबाबरोबरच समाजाच्या उभारणीतही मोलाची भूमीका बजावत आहे, अशा या सशक्त नारीला मानाचा मुजरा !

**- प्रविण बागडे**
**नागपूर**

## बच्चु भाऊ कडू यांच्या शेतकरी कर्जमाफीसह अन्य मागण्यांसाठी अभूतपुर्व सभेला शेतकऱ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे-हनुमंत तोंडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी/** राज्यातील शेतकरी,शेतमजूर, कामगार,मेंढ पाळ,मच्छीमार,दिव्यांग बांधव यांच्यासाठी आवाज उठवणारे लोकनायक संस्थापक अध्यक्ष माजीमंत्री मा. बच्चु भाऊ कडू यांच्या नेतृत्वात राज्यव्यापी हक्क यात्रा चालु आहे.त्या अंतर्गत एक जाहीर सभा २८ सप्टेंबर रविवार रोजी अबांजोगाई येथे पहिली सभा १० वा. संपन्न होणार आहे.दुसरी लगेचच गरड मंगल कार्यालय किल्ले धारूर येथे दुपारी १२:३० वाजता भव्य शेतकरी कर्जमुक्ती सभा आयोजित करण्यात आली आहे. असुन या हक्क यात्रेच्या जाहीर सभेत बीड जिल्ह्यातील जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आव्हान बीड प्रहार जनशक्ती पक्ष जिल्हा अध्यक्ष विलास भाऊ काळूंके,प्रहार जनशक्ती पक्ष युवक जिल्हा अध्यक्ष अशोक भाऊ सोनवणे, प्रहार



जनशक्ती पक्ष जिल्हा सरचिटणीस तथा किल्ले धारूर ता.अध्यक्ष हनुमंत तोंडे यांनी सर्व बांधवाना उपस्थित राहण्याचे आव्हान केले आहे.

महिलावर्ग,युवक सर्व उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी या बीड जिल्ह्यातील दोन्ही सभा अत्यंत निर्णायक ठरणार आहेत.

म्हणून या दोन्ही सभेला बीड जिल्ह्यातील सर्व नगरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन मा.बच्चु भाऊ कडू यांच्या नेतृत्वाला बळ देण्यासाठी या बीड जिल्ह्यातील दोन्हीही सभेला उपस्थित राहवे.

अशी माहिती बीड प्रहार जनशक्ती पक्ष जिल्हा अध्यक्ष विलास भाऊ काळूंके, प्रहार जनशक्ती पक्ष युवक जिल्हा अध्यक्ष अशोक भाऊ सोनवणे,प्रहार जनशक्ती पक्ष जिल्हा सरचिटणीस तथा किल्ले धारूर ता.

अध्यक्ष हनुमंत तोंडे यांनी सर्व शेतकरी,वचिंत घटक, सर्व बांधवाना उपस्थित राहाण्याचे आव्हान प्रसिद्धि पत्रकाद्वारे केले आहे.

## बहुजन क्रांती सेनाच्या जिल्हा प्रसिध्द प्रमुखपदी अनिस कुरैशी



**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण / प्रतिनिधी/** बहुजन क्रांती सेनेच्या जिल्हा प्रसिध्द प्रमुख तथा संपर्क प्रमुखपदी पाचोड ता.पैठण येथील रहिवासी अनिस कुरैशी यांची नियुक्ती करण्यात आली.ही नियुक्ती बहुजन क्रांती सेनेचे संस्थापक अनंत पटेकर यांनी छ.संभाजीनगर येथे आयोजित कार्यक्रमात नियुक्ती पत्र देऊन ही निवड करण्यात केली.

या निवड्डीबद्दल खासदार संदीपान पा.भुमरे,आमदार विलास पा.भुमरे, सभापती राजुनाना भुमरे. अनंत पटेकर,जिल्हाप्रमुख अर्चना बनकर,लीना अहिर प्रदेशाध्यक्ष महिला आघाडी बहुजन क्रांती सेनेचे लिना अहिर,अनिल बाविस्कर, सूर्यकांत भालेराव, अरुणा चांदणे ,रमेश जेठे,विनोद भोसले,राम मंजुळे प्रदेशाध्यक्ष अभिषेक सोनवणे,सुनील शिंदे आदींनी नवनिर्वाचित जिल्हा प्रसिध्द प्रमुख अनिस कुरैशी यांचे अभिनंदन केले.

## डोणगाव येथील आबासाहेब सरोवर यांची भाजपा गंगापूर उपाध्यक्षपदी निवड

**भाजपचे हीरचंद राजपुत यांची तालुका कार्यकारणी सदस्य पदी निवड..तर अल्पसंख्याक मोर्चा ता. अध्यक्षपदी गफुर पठाण यांची निवड**

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/फिरोज मन्सुरी/**गंगापूर तालुक्यातील डोणगाव येथील आबासाहेब सुरेश सरोवर यांची गंगापूर भाजपा तालुका उपाध्यक्षपदी आ बंब यांच्या आदेशाने भाजप जिल्हा अध्यक्ष किशोर धनायत यांच्या आदेशाने ता. अध्यक्ष रवी चव्हाण यांनी यांची निवड केली आहे तर वरझडी येथील सुनिल धनसिंग जोनवाळ प्रदीप जारवाल गोकुळवाडी इंद्रजीत जाधव दिवशी.



यांची ही सदस्य पदी निवड करण्यात आली आहे. रायपूर येथील संदीप शेलार यांची सोशल मीडिया तालुका प्रमुख पदी निवड झाली या सर्वांचे. या सर्वांच्या निवडीबद्दल रवींद्र चव्हाण पवन जाधव रवि बारसे शांतीलाल नवले संतोष आहेर आदिंसह गावकरी व मित्रमंडळी ने अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पैठण तालुका कांग्रेस अल्पसंख्याक तालुका उपाध्यक्ष पदी अनिस सांडु शेख




**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी/ प्रतिनिधि/** पैठण तालुक्यातील पिंपळवाडी पिराची गावाचे अनिस सांडु शेख यांच्या राजकीय,व सामाजिक क्षेत्रातील कामाची धावपळ लक्षात घेता काँग्रेस पक्षा नी त्यांची अल्पसंख्याक तालुका उपाध्यक्ष निवड केली. तालुका अध्यक्ष मुख्तार मद्देखा पठाण यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले.यावेळी राष्ट्रीय कामागार संघटनाचे राष्ट्रीय सचिव हारून शेख, अजिम भाई पठाण पत्रकार, राजेंद्र डवंडे, माजी पोलीस मगरे साहेब,अनिस हाफीज पत्रकार,वाहेद, शेख,अफसर शेख, उपस्थित होते.

# रुग्णवाहिकांना ‘जीपीएस’ बसविणे अनिवार्य; १ डिसेंबरपासून होणार कारवाई

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** रुग्णवाहिका म्हणून नोंद असणाऱ्या वाहनांना ‘जीपीएस’ बसविणे अनिवार्य आहे. येत्या १ डिसेंबर पर्यंत रुग्णवाहिकाधारकांनी आपल्या वाहनांवर ‘जीपीएस’ स्वखर्चाने बसवून घ्यावे व त्याची माहिती प्रादेशिक परिवहन विभागाकडे द्यावी, अन्यथा कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश आज झालेल्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरण बैठकीत देण्यात आले.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी होते. मनपा आयुक्त जी. श्रीकांत, अपर आयुक्त रणजीत पाटील, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल माने, पोलीस उपायुक्त भुजंग आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात शासकीय रुग्णवाहिकांव्यतिरिक्त अनेक संस्था, धर्मादाय रुग्णालये व खाजगी सेवाभावी व्यक्ति रुग्णवाहिका सेवा देत असतात. मात्र या रुग्णवाहिकांना जीपीएस प्रणाली बसविणे आवश्यक आहे. जेणेकरुन प्रत्येक रुग्णवाहिकेचा संचार नियमन करता येईल.

त्यामुळे सर्व रुग्णवाहिकांना संबंधितांनी स्वखर्चाने जीपीएस प्रणाली बसवून त्याची माहिती प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे द्यावी. त्यासाठी १ डिसेंबर ही मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर रुग्णवाहिकांची संबंधित यंत्रणांमार्फत तपासणी करुन पहिल्यावेळेस १० हजार रुपये दंड, दुसऱ्यावेळी २० हजार रुपये दंड व तिसऱ्या वेळी वाहन जप्त करुन नोंदणी निलंबन केले जाईल.

अनेक खाजगी रुग्णालयांच्या रुग्णवाहिका ह्या त्यांच्या रुग्णालयांव्यतिरिक्त इतरांना सेवा देत नाहीत, ही बाब गंभीर असून रुग्णवाहिकेचा मुळ उद्देश यामुळे




साध्य होत नाही. तथापि, जीपीएस बसविलेल्या रुग्णवाहिकांची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील नियंत्रण कक्ष व महापालिकेच्या स्मार्टसिटी मार्फत जनतेपर्यंत पोहोचविली जाईल जेणेकरुन अधिकाधिक लोक ऐनवेळीच्या मदतीसाठी रुग्णवाहिकाचालकांना संपर्क करु शकतील.

तसेच आजच्या बैठकीत ई- रिक्षांचे प्रवासी भाडेदर निश्चित करण्यात आले. सर्व ई रिक्षांना मिटर बसविणे अनिवार्य असून ते त्यांनी बसवून घ्यावे. विना इंडिकेटर रिक्षा चालविणाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. महिला प्रवाशांशी गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आल्यास कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. जे रिक्षामालक आपली रिक्षा अन्य रिक्षाचालकांना भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी देतात त्यांनी संबंधित चालकाचा परवाना, बक्कल , आधार कार्ड, पत्त्याचे पुरावे, मोबाईल क्रमांक प्रादेशिक परिवहन कार्यालयात व नजिकच्या पोलीस स्टेशनला जमा करावा.

बेकायदा वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांवरही कडक कारवाई करण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. वाळू वाहतुक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्याचेही निर्देश देण्यात आले. बेकायदा वाळू वाहतुक केल्याचे निदर्शनास ३० दिवसांसाठी वाहन जप्त करण्याची कारवाई करण्यात यावी,असेही संबंधितांना निर्देश देण्यात आले.

## अग्रसेन महाराज जयंती निमित्य निघालेल्या शोभायात्रेत भाजपा नेते पवारांचा सहभाग

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी/** श्री.छत्रपती अग्रसेन महाराज जयंती निमित्य कन्नड शहरात समाज बांधवांचे वतीने शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.या निघालेल्या भव्य- दिव्य शोभा यात्रेत कन्नड नगरीचे युवा उद्योजक तथा भाजप नेते श्री.मनोज पुष्पाबाई केशवराव पवार यांनी सहभाग नोंदवून या यात्रेचा आनंद घेतला.



या शोभायात्रेच्या आरंभी श्री.छत्रपती महाराज अग्रसेन उद्याणात १ रुपया वीट स्तंभाचे पुजन करण्यात आले.या शुभ आनंद उत्सव सोहळ्यासाठी उपस्थित राहिलेल्या युवा उद्योजक तथा भाजपा नेते श्री.मनोज पुष्पाबाई केशवराव पवार यांचे श्री.रुपेश भारूका,अग्रवाल युवा मंच तथा सकल अग्रवाल समाजाचे वतीने भव्य असे स्वागत करण्यात आले.यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष श्री.संजय खंबायते,युवा उद्योजीका सौ.उर्मिलाताई मनोज पवार,भाजपा मध्य मंडळाध्यक्ष श्री. सुनील पवार,अग्रवाल युवा मंचध्यक्ष श्री.रुपेश भारूका, श्री.रोहित पिरथानी, गोविंद भारूका, भाजपा व्यापारी जिल्हाध्यक्ष श्री. प्रशांत अग्रवाल, श्री.विकास भारूका श्री. विजय अग्रवाल, श्री.करण भारूका, श्री.अरुण भारूका, तेजस भारुका सुशांत भारूका,समित भारूका, एड.महेश भारूका,प्रदीप भारूका,पंकज भारूका सुभाष भारूका,अनिल पिरथानी,कीर्ती भारूका, सुनंदा भारूका,शोभा भारूका,शोभा भारूका, अर्चना भारूका,राधा अग्रवाल,वैशाली अग्रवाल, शितल केडिया,दीप्ती अग्रवाल,मोनिका भारूका, भाजपाचे कैलास जाधव,कुलकर्णी भाऊ, युवा मो.अध्यक्ष पवन ठाकूर,मनोज देशमुख, शंकर राऊत,संदीप नरवडे,संदीप उजागरे,इम्रान शेख,अमोल सोनवणे,रवी भालेराव,संदीप कांबळे,नवनाथ साळवे,दिलीप सोनवणे,अशोक वाहूळ,पं.स.मा.उपसभापती काकासाहेब तायडे,मनोज देशमुख सह असंख्य समाजबंधू व पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## लासूर स्टेशन येथील श्री नाथसागर येथे शारदीय नवरात्र महोत्सवाची उत्साहात

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे श्री स्वामी समर्थ अध्यात्मिक सेवा केंद्र सेवाकरी मंडळाच्या वतीने लासूर फेस्टिव्हल २०२५ अंतर्गत शारदीय नवरात्र महोत्सवाचे आयोजन करण्यात मोठ्या उत्साहात करण्यात आले आहे. यंदाचा महोत्सव सन्मान नारी शक्तीचा या विशेष संकल्पनेवर आधारित असून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांतून महिलाशक्तीचा गौरव केला जाणार आहे. दरम्यान मंडळाच्या वतीने दिलेल्या माहितीनुसार, दि. २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत दररोज सायं. ७ ते १० वाजेपर्यंत महोत्सवाचे विविध उपक्रम रंगणार आहेत. या मध्ये लहान मुले-मुलींची सांस्कृतिक सादरीकरणे, गरबा, दांडिया, जागर संगीतमय कार्यक्रम आदींचा समावेश आहे.

या कार्यक्रमाला ग्रामस्थांसह परिसरातील भाविकांचा मोठा प्रतिसाद

**नवरात्र महोत्सव निमित्त लासूर स्टेशन मधील सर्व माता भगिनींना कळविण्यात अत्यंत आनंद होतो की, नवरात्र उत्सवाचा आनंद द्विगुणीत होण्यासाठी महिला भगिनींना, लहान मुले-मुली यांच्या अंगी असणाऱ्या कलागुणांना चालना मिळावी म्हणून आपले मंडळ सन्मान नारी शक्तीचा या कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात येते आहे. तरी सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.असे आवाहन सावंगी ग्रुप ग्रामपंचायतचे उपसरपंच संपत छाजेड यांनी केले.**

लाभणार असल्याची माहिती या मंडळाचे मुख्य मार्गदर्शन सावंगी ग्रुप ग्रामपंचायतीचे उपसरपंच संपत छाजेड यांनी दिली. विशेष म्हणजे, या नवरात्र महोत्सवात महिलांच्या सहभागाला प्राधान्य देत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे.



या मध्ये लासुर स्टेशन मधील,१) ग्रामपंचायत महिला कर्मचारी, २) अंगणवाडी सेविका, ३) आरोग्य सेविका, ४) आशा सेविका या महिलांना सन्मान नारी शक्तीचा या संकल्पनेनुसार गौरवण्यात येणार आहे तसेच दररोज सर्व वयोगटातील भाग्यवान विजेत्यांना आकर्षण असे भेटवस्तू देण्यात येणार आहे. लासुर स्टेशन परिसरात नवरात्राचा उत्साह देवीभक्तांना धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद लुटता येणार आहे. तरी सर्वांनी उपस्थित राहावे असे आव्हान मंडळांनी केले आहे.

## कही बाधित शेतकरी पंचनामापासून वंचित राहता कामा नये- आमदारअब्दुल सत्तार

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव /प्रतिनिधी /** तालुक्यात गेल्या तीन चार वेळा झालेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणावर नदी-नाले काठावरील गावे, शेतीपिकांचे आणि रस्ते, पूल बाधित झाले आहेत. त्यामुळे प्रशासनाने योग्य समन्वय ठेवून तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे पूर्ण करावेत. यामध्ये एकही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये, असे निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी मंगळवारी (ता.२३) नैसर्गिक आपत्ती आढावा निमित्त आयोजित बैठकीत प्रशासनाला दिले.आमदार अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली सोयगाव येथील पंचायत समितीच्या बचत भवन येथे आज अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानी बाबत नैसर्गिक आपत्ती आढावा बैठक संपन्न झाली. याप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांना आमदार अब्दुल सत्तार यांनी सूचित केले.

**तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश**

या बैठकीस उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, तहसीलदार मनीषा मेने, गटविकास अधिकारी दादाराव आहिरे, नायब तहसीलदार संभाजी देशमुख, तालुका कृषी अधिकारी रमेश गुंडीले, पंचायत समिती कृषी अधिकारी संतोष भालेराव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अजय टाकसाळे, प्रीतम राठोड, जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उपअभियंता अशोक शाखावर, शाखा अभियंता दीपक मोगडे, राजेश राजगुरू, जलसंधारण अधिकारी सूर्यकांत निकम, बाल विकास प्रकल्प अधिकारी सुभद्रा सैवर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.गीतेश चावडा, पाणी पुरवठा विभागाचे विजय वाघ यांच्यासह शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रभाकर काळे,युवा सेना प्रमुख कुणाल राजपूत आदिंसह विविध गावातील आजी माजी लोकप्रतिनिधी, नुकसानग्रस्त शेतकरी, विविध विभागाचे अधिकारी - कर्मचारी उपस्थित होते.

सद्यस्थितीत प्रमाणापेक्षाही जास्त नुकसान झाले असून, तालुक्यातील विशेषतः बनोटी मंडळात नदी-नाले काठावरील शहरी आणि ग्रामीण भागाला याचा मोठा फटका बसला आहे. ग्रामीण भागातील शेतीपिकांसह गुरे-ढोरे, पशुधन, दुभती जनावरे वाहून गेली आहेत. पुराच्या पाण्याने रस्ते आणि पुलांचे भाग तुटल्यामुळे अनेक गावांचा संपर्कही तुटला आहे. त्यामुळे तो तातडीने पूर्ववत करण्याच्या सूचना आमदार अब्दुल सत्तार यांनी जिल्हा यंत्रणेला दिल्या आहेत. पुराच्या पाण्यामुळे वीजपुरवठा करणाऱ्या वीऊवाहिन्यांचे खांब पडले असून, हा वीजपुरवठ्याचे काम युद्धपातळीवर तातडीने पूर्ववत करावा. तसेच पूरग्रस्त भागात साथीचे रोग पसरण्याची भिती असून, त्यासाठी आरोग्य विभाग आणि पशुसंवर्धन विभागाने पावसामुळे होणाऱ्या साथीच्या आजारावर नियंत्रण ठेवण्याचे काम करावे. तसेच पशुधन वाचविण्यासाठी तातडीने



खबरदारीच्या उपाययोजना करताना लसीकरणाला प्राधान्य देण्याचे निर्देश आ. अब्दुल सत्तार यांनी दिले. नुकसान भरपाई देण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणेने योग्य समन्वय साधत तातडीने पंचनामे पूर्ण करावेत. या कामासाठी आवश्यकतेनुसार कृषि सहाय्यक, ग्रामसेवक, तलाठी व इतर तालुकास्तरीय अधिकारी-कर्मचारी यांची पथके गठीत करून पंचनामे कालमर्यादेत पूर्ण करण्याचे निर्देश आ. अब्दुल सत्तार यांनी दिले.

सिंचन प्रकल्पाची दुरुस्ती निर्धारित वेळेत पूर्ण न केल्यामुळे आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे शेतकऱ्यांना होणारा त्रास खपून घेणार नाही. अतिवृष्टीचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्वांनी एकत्र येऊन आपली जबाबदारी पार पडावी. पंचनामा करीत असताना हलगर्जीपणा करू नये आशा शब्दांत आ. अब्दुल सत्तार यांनी अधिकाऱ्यांची कान उघडणी केली. आढावा बैठकीस गैर हजर असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी उपविभागीय अधिकारी यांना दिल्या.

कोणीही मुख्यालय सोडू नये -

**ढगफुटी सदृश्य व सततच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या चिंतेत शेतकरी असल्या**

ने त्याला धीर देणे आवश्यक आहे. या आस्मानी संकटात सरकार आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे अशी भावना नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे यासाठी गावागावात जावून त्यांच्या अडचणी जाणून घ्या, नुकसानीची दाहकता लक्षात घेता कोणीही मुख्यालय सोडू नये, कायम गावकऱ्यांच्या संपर्कात रहा अशा सुचना आमदार अब्दुल सत्तार यांनी आढावा बैठकीत दिल्या.

## नवरात्र उत्सवाचे धार्मिक पावित्र्य जपण्यासाठी वाईट विचारांपासून दूर रहा -पुरूषोत्तम महाराज पाटील

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/प्रतिनिधी/** नवरात्री उत्सवाचे देवता असलेल्या आई जगदंबा ही मांगल्याची देवता असून या उत्सवाचे पावित्र्य जपण्यासाठी वाईट विचार व व्यसनाधिनता यापासून दूर राहून हरिनामाचे ध्यान करावे असे आवाहन प्रसिध्द किर्तनकार पुरूषोत्तम महाराज पाटील यांनी येथे बोलताना केले.गंगापूर शहरातील जि.प. प्रशालेच्या मैदानावर सुरू असलेल्या नवरात्रोत्सवाच्या पहिल्या माळेच्या किर्तनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उत्सवाच्या आयोजिका सुवर्णाताई जाधव, माजी नगराध्यक्ष संजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी प्रसिध्द व्यावसायिक संतोष अंबिलवादे यांच्या हस्ते सपत्निक आरतीने उत्सवाला प्रारंभ झाला.

याप्रसंगी पुरूषोत्तम महाराज म्हणाले की, नवरात्रीमध्ये खेळल्या जाणारा गरबा हा महिला महिलांमध्ये खेळल्या गेला पाहिजे, डिजे ऐवजी पारंपारिक वाद्यांचा वापर करावा, नवरात्री उत्सव हा धार्मिक उत्सव असल्यामुळे कार्यक्रम ठेवताना लावण्या ऐवजी धार्मिक कार्यक्रमांचाच समावेश या उत्सवामध्ये केल्यास या उत्सवाचे पावित्र्य टिकण्यास मदत होईल.याप्रसंगी पुरूषोत्तम महाराज यांनी त्यांच्या सुमधूर आवाजात संत तुकाराम महाराजांच्या ''बरें झालें देवा निघालें दिवाळें, बरी या दुष्काळें पीडा केली'', या अभंगात तत्कालिन परिस्थितीत शेतकऱ्यांची देशातील पहिली कर्जमाफी तुकाराम महाराजांनी केल्याचे सांगून 'मनी नाही भाव म्हणे, देवा मला पाव, देव बाजारचा भाजीपाला नाही' या तुकडोजी महाराजांच्या अभंगावरही सुंदर विश्लेषण करून दोन तास गंगापूरवासियांना खिळवून ठेवले



होते. यावेळी तुकाराम सटाले, सोपान देशमुख, सुदामराव मंडलिक, कृष्णा पाटील, संदीप वरकड, अमोल वरकड, विशाल दारूंटे, बाबासाहेब लगड, प्रा. दिलिप बिरूटे यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ‘जालना मित्र पोर्टल’ जिल्ह्याचा डिजिटल उपक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**


**जालना (प्रतिनिधी)** महाराष्ट्रात डिजिटल युगाची नवी सुरुवात जालना जिल्ह्यात झाली आहे. जिल्हा प्रशासनाने सुरु केलेल्या जालना मित्र पोर्टल मुळे नागरिकांना तब्बल १९ शासकीय सेवा घरबसल्या मिळणार आहेत. केवळ १०० रुपये अतिरिक्त शुल्क भरून आता आधार कार्डपासून वृद्धत्व पेन्शनपर्यंतची कामे नागरिकांच्या घरीच पूर्ण केली जाणार आहेत. या उपक्रमामध्ये राज्यात जालना जिल्हा हा पहिला ’डिजिटल जिल्हा’ होण्याकडे वाटचाल करीत आहे.

**नागरिकांना घरपोच सरकारी सेवा उपलब्ध करून देणारा**

जालना मित्र पोर्टल म्हणजे काय ?

शासकीय कामासाठी विविध कार्यालयात सामान्य नागरिकांना तासन्तास रांगेत उभे रहावे लागते. शासकीय कार्यालयात अनेक फेऱ्या मारण्यात वेळ आणि पैशाचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो. महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा अंतर्गत नागरिकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवा नागरीकांना घरपोच मिळाव्यात यासाठी जालना जिल्ह्याने ‘जालना मित्र पोर्टल’ हा नावीन्य पूर्ण उपक्रम जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आला आहे. ‘जालना सेवा पोर्टलवर’ यासाठी जिल्हातील कुठल्याही नागरिकांने आपल्या कामासंबंधी या पोर्टलवर जावून अपॉइंटमेंट बुक करायची आणि प्रतिनिधी थेट त्यांच्या घरी येऊन ती सेवा उपलब्ध करून देणार आहे.

‘जालना मित्र’ या पोर्टलमध्ये नागरिक स्वतः नजीकच्या आपले सरकार सेवा केंद्राची अपॉइंटमेंट घेवू शकतात. त्याप्रमाणे आपले सरकार सेवा केंद्रचालक संबंधित नागरिकाच्या घरी जावून सर्व कागदपत्रे घेवून आपले अर्ज भरून घेतील. यासाठी नागरिकांनी आपल्या मोबाईल क्रमांकाद्वारे लॉगिन करायचे आहे. आपल्याला ज्या विभागाशी निगडित काम आहे, तो विभाग निवडून, त्या विभागातील सेवा निवडायची आहे. नंतर आपणास त्या सेवेसाठी आवश्यक फिस, कागदपत्रे, भेट व दिनांक उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच, या पोर्टलवरून अपॉइंटमेंट घेतांना त्या सेवेसाठी लागणारे शासकीय शुल्क आणि घरपोच सेवेसाठी आकारण्यात येणारे १०० रूपये शुल्क हे पोर्टलवर दिसणार आहे. त्यामुळे नागरिकांनी तेवढेच पैसे द्यावेत.






**पोर्टलवरील १३ विभाग**

अन्न व नागरी पुरवठा विभाग, पासपोर्ट-परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण, पोलीस/गृह विभाग, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, आयकर विभाग, ग्रामीण विकास विभाग,भूमी अभिलेख विभाग, समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग, आरोग्य विभाग,डिजिटल जीवन प्रमाण,महसूल विभाग,सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्यम मंत्रालय या विभागाचा समावेश आहे.

कोणत्या सेवा उपलब्ध ?

जीवनावश्यक सेवा, राशन कार्ड, आधार कार्ड, पासपोर्ट पोलीस व्हेरिफिकेशन, व्यवसायिक सेवा, चडचए नोंदणी, ऋडड-ख परवाना, सामाजिक सेवा, वृद्धत्व पेन्शन, निवास दाखला, डिजिटल सेवा, जीवन प्रमाणपत्र, भूमी अभिलेख (७/१२, फेरफार इत्यादी.)

**नागरिकांना काय फायदा होणार ?**

जालना मित्र या एका पोर्टलवर १३ विभागाच्या १९ सेवा नागरिकांना घरपोच उपलब्ध होणार आहे. या पोर्टलमुळे नागरिकांना विहीत कालावधीत सेवा उपलब्ध होणार असून, नागरिकांची वेळेची बचत होणार आहे. तसेच दिवसभराची कामे देखील आता काही तासातच पूर्ण होण्यास मदत होणार आहेत. यामुळे नागरिकांच्या प्रवासाचा खर्च शून्य होणार असुन पैशांची बचत होणार आहे. तसेच पारदर्शक शुल्क राहणार असुन कोणतेही लपविलेले शुल्क घेण्यात येणार नाही. तसेच नागरिकांना २४द७ ऑनलाइन बुकिंग सुविधा उपलब्ध असणार आहे.

**प्रशासनाची भूमिका**

जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल या जालना मित्र पोर्टल बाबत म्हणाल्या की, हा उपक्रम नागरिक सेवेत नवा मानदंड ठरेल. नागरिकांना आता कार्यालयात यायची गरज पडणार नाही.

तर प्रशासनच आता नागरिकांच्या दारापर्यंत पोहोचणार आहे. पारदर्शकता, वेळेची बचत आणि विश्वासार्हता हे या उपक्रमाचे मुख्य स्तंभ आहेत.

जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, जालना जिल्हा डिजिटल इंडियाच्या दिशेने अग्रगण्य ठरत आहे. हा उपक्रम इतर जिल्ह्यांसाठी आदर्श ठरेल.

**नागरिकांची मते**

जालना तालूक्यातील वझर सरकटे येथील विद्यार्थी म्हणतो की, मी इयत्ता दहावीत शिकत असून, मला रहिवासी प्रमाणपत्र काढायचे होते. मी जालना मित्र पोर्टलवर जाऊन बुकींग केली. लगेचच माझ्या जवळील आपले सरकार सेवा केंद्रावरील मित्राने माझे कागदपत्रे घरी येऊन घेतली. तसेच मला घरी प्रमाणपत्र आणून दिले. जालना जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे आम्हा विद्यार्थ्यांना प्रशासनाप्रती आदर वाढला असुन यामुळे आमचा अभ्यासाचा देखील वेळ सुद्धा वाया गेला नाही.

नागरिकांनी ‘जालना मित्र पोर्टल’ वापरण्यासाठीची सोपी पद्धत (३ स्टेप्स असुन) https://jalnamitra.in या पोर्टलवर मोबाइल नंबरने लॉगिन करावे. सेवा व विभाग निवडा, अपॉइंटमेंट बुक करा. शुल्क + १०० घरपोच सेवा फी भरावी आणि सेवा घरपोच प्राप्त करुन घ्यावी.

**संपर्क कुठे करायचा ?**

या सेवेसाठी नागरिकांनी https://jalnamitra.in या संकेतस्थळास भेट द्यावी. जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांच्याकडे आतापर्यंत या पोर्टलमार्फत २० सेवांसाठी ६१ नागरिकांनी नोंदणी केली आहे.

यापैकी २८ नागरिकांच्या अर्जाबाबतचे कागदपत्रे हस्तगत करण्यात आले असून, पुढील कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी ०८ लोकांच्या घरी जाऊन सदरील सेवा जालना मित्र पोर्टलने उपलब्ध करुन दिली आहे. जिल्ह्यातील नागरिकांसाठी ‘जालना मित्र पोर्टल’ हि ऑनलाईन सेवा नक्कीच फायदेशिर आणि उपयुक्त ठरणार आहे.

## पूरग्रस्त भागात मूलभूत सुविधांची कमतरता जाणवत असून, लोकांना तात्काळ मदतीची गरज- आमदार बबनराव लोणीकर

**आताच एक्सप्रेस**

**आष्टी /प्रतिनिधी** /गोदावरी नदीला आलेल्या पुरामुळे बाधित झालेल्या गावांमध्ये मदत आणि बचाव कार्य सुरू करण्यात आले असून संततधार पावसामुळे गोदावरी नदीच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे, ज्यामुळे नदीकाठच्या अनेक गावांमध्ये पाणी शिरले आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांच्या पुढाकाराने स्थानिक प्रशासनाने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (NDRF) टीमला पाचारण केले असून, त्यांच्या मदतीने बचाव कार्य वेगाने सुरू आहे. आतापर्यंत अनेक पूरग्रस्त लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. बचाव कार्यात बोटींचा वापर केला जात आहे. तसेच, बाधित लोकांना अन्न, पाणी आणि वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर व लोणी खुर्द येथील सरपंच गजानन लोणीकर यांच्या वतीने मदत छावण्या उभारण्यात आल्या आहेत. अशी माहिती माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी दिली.



यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल भैया लोणीकर उपविभागीय अधिकारी श्री गायकवाड तहसीलदार डॉ प्रतिभा गोरे, गटविकास अधिकारी श्री राजेश तांगडे, तालुका आरोग्य अधिकारी श्री डाके यांच्यासह

लोणी खुर्द चे सरपंच गजानन लोणीकर अण्णासाहेब ढवळे दादाभाऊ तौर उद्धवराव काटे उद्धव डोळस गंगाधर घुगासे दत्ता तौर गणेश ढवळे आनंद काटे ऋतिक डोळस शेख बाबूलाल चंदन मस्के सर्जेराव तौर रामकिसन कांडुरे गजानन लोणीकर मधुकर मोरे बाबुराव थोरात विष्णु शहाणे श्रीधर गांजाळे सुरेश जगताप अण्णासाहेब ढवळे दादाभाऊ तौर उद्धवराव काटे उद्धव डोळस गंगाधर घुगासे दत्ता तौर गणेश ढवळे आनंद काटे ऋतिक डोळस शेख बाबूलाल चंदन मस्के सर्जेराव तौर रामकिसन कांडुरे मधुकर मोरे बाबुराव थोरात विष्णु शहाणे सिद्धू केकान श्रीसर गांजले सुरेश जगताप यांच्यासह गावकरी महिला पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जालना येथे ३० सप्टेंबर रोजी पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा भरती मेळाव्याचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,जालना अणि मातोश्री स्किल डेव्हलमेंट सेंटर,जालना यांचे संयुक्त विद्यमानाने दिनांक ३० सप्टेंबर २०२५ मंगळवार रोजी मातोश्री स्किल डेव्हलमेंट सेंटर, अंबड रोड,जालना येथे सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. यासाठी अंदाजे २५२ पेक्षा अधिक रिक्तपदे उपलब्ध होणार आहेत.

नमो महारोजगार मेळाव्यानिमित्त या मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या मेळाव्यामध्ये निवड झालेल्या निवडक उमेदवारांना नमो महारोजगार मेळाव्यामध्ये दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी बी.के.सी. बांद्रा मुंबई येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हस्ते नियुक्ती आदेश देण्यात येणार आहे.

रोजगार कार्यालयाकडील नोंदणीकृत सुशिक्षित महिला व पुरुष उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी सहाय्य होण्याच्या दृष्टीने या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यात रोजगार देणा-या विविध नामांकित कंपन्या व नियोक्ते उपस्थित राहुन व प्रत्यक्ष मुलाखती घेवून उमेदवारांची निवड करणार आहे.

सदर मेळाव्यामध्ये नियोक्त्यांकडून २५२ रिक्तपदे एसएससी, एचएससी, कोणतेही पदवीधर, आयटीआय ट्रेडधारक (फिटर,वेल्डर, इलेक्ट्रीशियन, मशिनिष्ट, अप्रेन्टीस ट्रेनी, अकाउंटंट असिस्टंट, डाटा एन्ट्री ऑपरेटर, सर्व्हिस अॅडव्हायझर इत्यादी) १८ ते ४५ वयोगटातील पात्रताधारक उमेदवारांसाठी पदे उपलब्ध झालेली आहेत. आणखी काही पदे उपलब्ध होणार आहेत.

तसेच या मेळाव्यात स्वयंरोजगाराबाबत अर्थसहाय्य करणा-या विविध शासकीय महामंडळाचे स्टॉल लावण्यात येणार असुन विविध योजनांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. याच बरोबर स्टॉलच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना अंतर्गत विनामुल्य असलेले विविध रोजगारक्षम कौशल्य प्रशिक्षणाची माहिती देऊन नोंदणी करण्यात येणार आहे.या सुवर्ण संधीचा जास्तीत जास्त नोकरी इच्छूक महिला व पुरुष उमेदवारांनी लाभ घ्यावा. तसेच उमेदवारांनी याचा लाभ घेण्यासाठी किमान पाच प्रतीत बायोडाटा व फोटो आणि आधारकार्ड,सेवायोजन नोंदणी कार्ड इ. कंपनींना देण्यासाठी सोबत ठेवावे.नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्याप पर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी किंवा यापुर्वी महास्वयंम वेबपोर्टलवर नोंदणी केली असल्यास वरील रिक्तपदे व पात्रते प्रमाणे मॅचिंग होणा-या पदांसाठी ऑनलाईन प्लाय करुन लॉगीन करावे आणि प्रत्यक्ष मुलाखतीसाठी रोजगार मेळाव्याच्या ठिकाणी सकाळी ९ वाजता उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर भेट देऊन आगामी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा या सदराखाली जालना जिल्हा निवडून पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यामधील तपशिल पाहावा.

याबाबत काही अडचण आल्यास सहाय्यासाठी कार्यालयाच्या ०२४८२-२९९०३३ या दूरध्वनीवर कार्यालयीन वेळेत संपर्क करावा किंवा क्षरश्रपरीक्षसरीसारळश्र.लो या ई-मेलवर संपर्क करावा.या मेळाव्याचा जास्तीत जास्त उमेदवारांनी उपस्थित राहुन लाभ घ्यावा. असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

## खासदार डॉ. कल्याण काळे साहेब यांनी घेतली अतिवृष्टी संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांची भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यात १५ सप्टेंबर २०२५ पासून सुरू असलेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरातील अनेक भागांत पाणी साचल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले असून ग्रामीण भागात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शेतीपिके, घर, जनावरे व मालमत्तेचे प्रचंड नुकसान होऊन शेतकरी व नागरिक आर्थिक संकटात सापडले आहेत.

या गंभीर परिस्थितीची तात्काळ दखल घेऊन बाधितांना मदत मिळावी यासाठी आज जालना जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी यांची भेट घेण्यात आली. यावेळी तातडीने पंचनामे करून सर्व बाधित घटकांना मदत मिळावी तसेच शासनाकडे सविस्तर अहवाल पाठवून योग्य ती नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी ठाम मागणी खासदार डॉ. कल्याण काळे साहेबांनी केली.

अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या प्रत्येक शेतकरी व नागरिकाला न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करू, असा ठाम निर्धार खासदारांनी व्यक्त केला. शासनाने त्वरित पावले उचलून मदतकार्य सुरू करावे, अशी सर्वानुमते मागणी यावेळी करण्यात आली.यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, कल्याणजी दळे, जे. प्रकाश चव्हाण, बबलू चौधरी, अजय बनकर, त्रिंबक पाबळे, कृष्णा पडूळ, लक्ष्मण मसलेकर, श्रीरंग कामटे, राम शिरसाठ, सोपान तिरुके, ज्ञानेश्वर इंगोले, विष्णू पाटील शेजुळ आदी पदाधिकारी व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळून देण्यासाठी शासन दरबारी पाठपुरावा करणार - भास्कर आबा दानवे



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना तालुक्यात मागील तीन दिवसांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावा सह शेतात पूराचे पाणी शिरल्याने शेतीसह पिकांचे अतोनात नुकसान होऊन शेती व पिक वाहून गेले अशा अतिवृष्टीग्रस्त गावे मौजे धारकल्याण, वडगाव वखारी, नाव्हा, पत्रातांडा इत्यादी ठिकाणी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांसोबत संवाद साधून शेतकऱ्यांना धीर देऊन सांगितले की, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी शासन दरबारी आपण स्वत पाठपुरावा करणार व शेतकऱ्यांना मदत मिळवून देणार असे त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपा जेष्ठ नेते शिवाजी दादा शेजूळ, जिल्हा सरचिटणीस वसंत शिंदे, सुनील पवार, मंडळ अध्यक्ष संजय डोंगरे, भाजपा एस.सी.मोर्चा जिल्हाध्यक्ष अनिल सरकटे, कैलास उबाळे, निवृत्ती लंके, पांडुरंग क्षीरसागर, मुकेश चव्हाण, नागेश अंभोरे, सतीश जारे, किशोर कदम, विनायक राठोड, मुरलीधर जाधव उपस्थित होते.

आज त्यांनी वरील गावांचा दौरा केला असता धारकल्याण येथे सिमेंट नाला बंधारा फुटल्याने शेतकऱ्यांची शेती वाहून गेली व अनेक ठिकाणी काढणीस आलेले सोयाबीन व कपासी सह अनेक पिके पुराने वाहून गेली व काही ठिकाणी पिकांमध्ये दोन ते तीन फुट पाणी साचल्याने पिके पाण्यात डुबून गेली. यावेळी तालुक्यातील अनके शेतकरी बांधवांनी आपल्या व्यथा डोळ्यामधून आश्रू ढाळून त्यांच्यासमोर मांडल्या त्यावेळी भास्कर आबा दानवे यांनी शेतकऱ्यांना धीर देऊन वरील आश्वासने दिले.यावेळी परिसरातील विष्णू ढोबळे, काकासाहेब उगले, राजू उगले, विष्णू दराडे, प्रभाकर खोतकर, विष्णू घोडके, मिसाळ मामा दिनकर दराडे, विनायक उगले, सुभाष भुतेकर, वैभव उगले, कृष्णा यादव, भरत उगले, फकीरबा उगले, विनायक ताठे, सतीश उगले, इत्यादीसह भागातील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या-ज्ञानेश्वर उगले यांची मागणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जालना तालुक्यातील रोहणवाडी परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात तसेच घरात पाणी साचल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेला आहे.या पार्श्वभूमीवर शासनाने सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी, अशी ठाम मागणी ज्ञानेश्वर (माऊली) उगले यांनी केली आहे.या अतिवृष्टीची पाहणी महसूल विभागाकडून करण्यात आली. यावेळी महसूल अधिकारी नारायण डाके, ग्रामपंचायत अधिकारी कोथळकर, सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती खांडेभराड यांनी हजेरी लावून पिकांचे पंचनामे केले.याप्रसंगी नुकसानग्रस्त शेतकरी आप्पासाहेब साळसे, दत्ता तनपुरे, बाबासाहेब चाळसे, जपालसिंग बुंदले, किसन उगले, सतीश बुंदले, अजिंक्य उगले, अंकुश बागराज, अण्णासाहेब तनपुरे, गुड्डू शेठ, विठ्ठल काळे यांच्यासह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.शेतकऱ्यांची दैना लक्षात घेता तात्काळ मदतीची गरज असल्याचे प्रतिपादन करून शासनाने तत्पर निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.




## मंमादेवी मंदिर चौकात गुरुवारी अंजली द्विवेदी यांची भजन संध्या

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**



नवरात्रोत्सवानिमित्त महावीर ढक्का मित्र मंडळ व श्री मंमादेवी मित्र मंडळ यांच्यावतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही मंमादेवी चौकात मातेचे भव्य जागरण ही दोन दिवसीय भजन संध्या आयोजित करण्यात आली असून, त्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील भजन गायक आपल्या सुरेल स्वरांनी भक्तांना मंत्रमुग्ध करणार आहेत. बुधवार दि. २४ सप्टेंबर रोजी रात्री ७ वाजता भजन गायक शुभम दायमा आणि मनीष दायमा यांची भजन संध्या होणार आहे. २५ सप्टेंबर रोजी रात्री ७ वाजता आंतरराष्ट्रीय भजन गायिका सौ. अंजली द्विवेदी यांची भजन संध्या होणार आहे.भाविक भक्तांनी भजन संध्येचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावीर ढक्का मित्र मंडळ व श्री मंमादेवी मित्र मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813